माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील गट-अ आणि गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल महापार प्रणालीत ऑनलाईन पध्दतीने लिहिण्याकरिता प्राथमिक परिरक्षक यांची नियुक्ती तसेच मार्गदर्शक सूचनांबाबत.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/७८५/प्र.क्र.१८४/३४-अ

६ वा मजला,मंत्रालय विस्तार इमारत,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक:- ३१ जानेवारी, २०१८.

वाचा :- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. सीएफआर- १२११/ प्र.क्र.२५७/१३, दि.१५ डिसेंबर,२०१७.

शासन निर्णय:-

सन २०१७-१८ पासून गट-अ व गट-ब(राजपत्रित) संवर्गातील सर्व राज्य शासकीय अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल ऑनलाईन पध्दतीने नोंदविण्यासाठी MahaPAR ही ऑनलाईन प्रणाली कार्यरत करण्यात आली आहे. यानुषंगाने करावयाची कार्यपध्दती उपरोक्त संदर्भाधीन दि.१५.१२.२०१७ च्या शासन परिपत्रकात सविस्तरपणे विषद करण्यात आली आहे.

२. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल या प्रणालीत नोंदविण्यासाठी संचालक (माहिती) (प्रशासन), मुख्यालय, मुंबई यांना **"प्राथमिक परिरक्षक"** म्हणून नियुक्त करण्यात येत आहे.

३. तसेच संदर्भाधीन परिपत्रकातील परिच्छेद-५ मध्ये नमूद केल्यानुसार खालील रकाना-२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे OU (Organization Units) व प्रत्येक OU करीता त्यासमोर रकाना-३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे **"अतिरिक्त परिरक्षक"** नियुक्त करण्यात येत आहेत.

अ.क्र.	Organization Unit (OU)	अतिरिक्त परिरक्षक
१	२	३
१	माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुख्यालय, मुंबई	वरिष्ठ सहायक संचालक(प्रशासन), मुख्यालय, मुंबई.
२	विभागीय माहिती कार्यालय, नागपूर-अमरावती विभाग ,नागपूर	संचालक (माहिती), नागपूर-अमरावती विभाग, नागपूर.

३	विभागीय माहिती कार्यालय, मराठवाडा विभाग, औरंगाबाद.	संचालक (माहिती), मराठवाडा विभाग, औरंगाबाद.
४	विभागीय माहिती कार्यालय, पुणे	उपसंचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, पुणे
५	विभागीय माहिती कार्यालय, नाशिक	उपसंचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, नाशिक
६	विभागीय माहिती कार्यालय, कोकण	उपसंचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, कोकण
७	विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर	उपसंचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर
८	विभागीय माहिती कार्यालय, अमरावती	उपसंचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, अमरावती
९	विभागीय माहिती कार्यालय, लातूर	उपसंचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, लातूर
१०	महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली	उपसंचालक (माहिती), महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली
११	महाराष्ट्र परिचय केंद्र,पणजी-गोवा	उपसंचालक (माहिती), महाराष्ट्र परिचय केंद्र, पणजी-गोवा

४. अतिरिक्त परिरक्षकांनी त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयातील सर्व गट-अ व गट-ब (राजपत्रित) अधिकाऱ्यांची सोबतच्या **परिशिष्ट-"ड"** मधील प्रपत्रात अद्ययावत माहिती (EMD-Employee Master Data) Excel Format मध्ये तयार करावी. EMD मध्ये नमूद करण्यात आलेला मोबाईल क्रमांक आधार क्रमांकाशी जोडलेला असावा, जेणेकरुन महापार प्रणालीमध्ये ई-साईन या सुविधेचा वापर करणे सुलभ होईल. ही सर्व माहिती अतिरिक्त परिरक्षक यांनी प्राथमिक परिरक्षक यांना पाठवावी. तसेच त्याची आगाऊ प्रत शासनास पाठवावी. अतिरिक्त परिरक्षक आवश्यकतेनुसार त्यांच्या नियंत्रणाखालील एक किंवा अधिक कर्मचाऱ्यांना पार व्यवस्थापक (Par Manager)म्हणून घोषित करु शकतील.

५. प्राथमिक परिरक्षक यांनी अतिरिक्त परिरक्षक यांचेकडून प्राप्त माहिती एकत्रित करुन ती माहिती व **परिशिष्ट-"ई"** मधील माहिती NIC यांना Support-mahapar@nic.in या ई-मेल आयडीवर उपलब्ध करुन द्यावी. तसेच त्याची एक प्रत शासनास पाठवावी.

६. महापार प्रणालीमध्ये विविध स्तरावर कार्य करणाऱ्या अधिका-यांची कर्तव्ये व जबाबदा-या उपरोक्त संदर्भाधीन दि.१५.१२.२०१७ च्या शासन परिपत्रकातील परिशिष्ट-फ मध्ये दर्शविल्याप्रमाणे असतील.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१३११६२२००१४०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramkisan Narayanrao Musale

Digitally signed by Ramkisan Narayanrao Musale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e28f6332f6edfebdfb055bf154f99ec0b0d9e613209e20e7a215f026da6875ae, cn=Ramkisan Narayanrao Musale
Date: 2018.01.31 16:32:56 +05'30'

(रा.ना.मुसळे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सचिव (मावज), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२.

३. संचालक (माहिती) (प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२.

४. सर्व विभागीय माहिती कार्यालये.

५. महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली.

६. महाराष्ट्र परिचय केंद्र, पणजी-गोवा.

७. वरिष्ठ सहायक संचालक(प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय,मुंबई-३२.

८. निवड नस्ती.